
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 3 | DECEMBER - 2019

# एस. एल. भैरप्पा यांच्या ‘पर्व’ या पौराणिक कादंबरीची मीमांसा

प्रा. किशोर यादवराव बुटले
मराठी विभागप्रमुख, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ,



## प्रास्ताविक :

‘कादंबरी’ या वाङ्मय प्रकारात सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, प्रादेशिक, काव्यात्म, आत्मचरित्रात्मक, विज्ञानविषयक असे काही प्रकार पडतात. डॉ.एस.एल. भैरप्पा यांनी लिहिलेली ‘पर्व’ ही कादंबरी पौराणिक कादंबरीत मोडते. कारण पुराण कथेवर आधारित जी कादंबरी असते ती कादंबरी म्हणजे पौराणिक कादंबरी. पुराण कथेवर आधारित ज्या कथा असतात त्या तशाच कादंबरीत न येता त्यांचे इंटरप्रिटेशन (विश्लेषण) वेगवेगळ्या अंगाने देण्यात येते. महाभारत या पुराणाचा अभ्यास करून, प्रत्यक्ष ज्या उत्तर भारतात हे महाभारत घडले. तेथे प्रत्यक्षात जाऊन, त्याच चालीरीती आजही अस्तित्त्वात असल्याच्या पाहून भैरप्पांना ‘पर्व’ ही कादंबरी लिहायची प्रेरणा मिळाली. आणि त्यामध्ये त्यांनी यशही मिळविले. महाभारत तसा जगभरातील जिज्ञासू लोकांचा अभ्यासाचा विषय. भैरप्पा त्यापैकीच एक. महाभारतातील प्रसंग जसेच्या तसे न घेता वास्तविकतेच्या अंगाने स्पर्श करून त्यांनी ‘पर्व’ ही पौराणिक कादंबरी लिहली. पुराणात जसे चमत्कार, स्वर्ग—नरक, पाप—पुण्य ह्या कल्पना आल्या तशाच किंबहुणा थोडा बदल करून भैरप्पांनी त्या ‘पर्व’ कादंबरीत घेतल्या. एखादा महाभारतातील प्रसंग अधिक खुलवून सांगायचा असल्यास भैरप्पा तो प्रसंग अधिक खुलावट करून पाहतात.

हिमालयात भैरप्पा फिरत असतांना पांडुराजा आणि त्यांच्या कुंती—माद्री या व्यक्तिरेखा त्यांच्या भरून गेल्या केवळ याच वेळी नव्हे, भव्य हिमालयानं तिथल्या संपन्न हिरवळीनं आणि हिमालयाच्या शुभ्रतेनं त्यांच्या अंतरमनाला नेहमी चेतना दिली. त्यांनी वाचलेल्या उपनिषद आणि महाभारतासारख्या प्राचीन साहित्यकृतींचा वेगळाच गर्भीत अर्थ हिमालयाच्या पार्श्वभूमीवर एकाएकी सामोर येतो, असा त्यांचा समज आहे. सांस्कृतिकदृष्ट्या हिमालयाशी असलेलं त्यांचे नाव यासाठी कारणीभूत आहे, ज्यांना लेखक आपल्या साहित्यिक परंपरतेत मानतो, त्या व्यास, कालिदास आणि उपनिषद्कर्त्यांनाही याच हिमालयानं प्रेरणा दिली आहे. ही त्यांची मनोभावना त्यामागे आहे. त्यांच्या कितीतरी कादंबऱ्या हिमालयाच्या अंगा—खांद्यावर निवांतपणे वावरतांना, विकसीत झाल्या आहेत. आता महाभारतातील व्यक्तित्त्वेही इथेच साकार होऊ लागली. पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश, बिहार येथील स्त्री पुरूषांची देहयष्टी, स्वरूप त्यांच्या सामाजिक पद्धती आणि त्यांचे मनोधर्म त्यांनी न्यायाहळले. बऱ्याच दृष्टींनी हे लोक ‘दक्षिणात्यां’पेक्षा महाभारताशी जवळचे आहे, अशी त्यांची धारणा झाली. नंतर त्यांची बदली म्हैसूरला झाली. एकीकडे त्यांनी पाहिलेला उत्तर भारतीय समाज. इतिहास काळात डोकावून तिथलं ऐतिहासिक समाजातील जाणून घेण्याची आशा आणि दुसरीकडे जीवनामध्ये त्यांना सतत छळत असलेल्या काही समस्या जाणून घ्यायची उत्कंठा, यामधून महाभारताचं सखोल अध्ययन करण्याची दुर्दम्य इच्छा भैरप्पांच्या मनात दाटून आली. त्यातूनच कादंबरीचा जन्म होऊ शकेल, असेही त्यांना वाटले. ह्या सर्व अभ्यासातून व्यासांच्या महाभारताच्या पाश्वभूमीवर वेगळंच महाभारत लेखकासमोर उलगडू लागलं. ‘पर्व’ या कादंबरीचं मूलद्रव्य भावनामध्ये चांगलेच एकजीव होऊन गेलं. मनात अनूकुल पात्रे तयार झाली. प्रत्यक्ष महाभारत झालं त्या

ठिकाणचा प्रवास केला. आणि त्यातून आकारला आली 'पर्व' ही कादंबरी.

ययाती या कादंबरीमध्ये प्रत्येक पात्र स्वत:च्या वर्तनाचं समर्थन करतात असा मनोविश्लेषणात्मक अर्थही त्यात असू शकतो. 'पर्व' मध्ये अन्वयार्थ वेगळा घेतला आहे. मनोविश्लेषणात्मक नाही. हे या कादंबरीचे विशेष आहे. ''मराठी साहित्यात पौराणिक कादंबरी क्वचितच लिहिली गेली. त्यातही ही हेतुपूर्वकता होती. खरे म्हणजे भारतीय लेखकाचे महत्भाग्य असे की, त्यांच्याकडे पौराणिक कथांचे भांडार प्रचंड. महाभारत, रामायण, पुराणकथा, जातककथा, पंचतंत्रकथा इत्यादींनी लेखकाचे मन संस्कारित व्हायला केवढी तरी संधी पण शिक्षित समाजाने याकडे पाठ फिरवलेली दिसते.'' असा अभिप्राय डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर देतात. तो योग्य वाटतो.

वेगळ्या अंगाने म्हणजे योध्यांच्या भाव भावनांचा मागोवा घेऊन जगासमोर मांडले. महाभारतातील काही सुटलेले दुवे घेऊन त्या दुव्यांचा विस्तार वास्तवाच्या अंगाने करून कथानक मांडले. म्हणून रसिक वाचकांचा ताबा 'पर्व' या पौराणिक पात्रांचा आधार घेऊन भैरप्पांनी प्राचीन हिंदु धर्म–संस्कृतीचा विचार वाचकांच्या मनावर टाकला. त्याला तोड नाही.

डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''आजच्या जीवनातील परिस्थिती व समस्या याची उत्तरे देण्यासाठी पौराणिक कथावस्तूंचा उपयोग करणे हा एक पौराणिक कादंबऱ्यांचा प्रमुख उद्देश आहे. अहिल्योद्धार मध्ये ना.के. बेहरे यांनी वाकडे पाऊल पडणाऱ्या स्त्रियांबद्दल माणुसकीयुक्त कळवळा बाळगावा व त्यांचा उद्धार करावा, असे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. परळकर यांची 'वत्सला– अभिमन्यू' श्री. भावे यांची 'सावित्री– सत्यवान' वि.वा. हडप यांची 'चिरंजीव' श्री. शिवराम यांची 'सामर्थ्याचा गर्व,' ही नावे घेतली की, या काळातल्या पौराणिक कादंबऱ्यां विषयी अधिक चर्चा करण्याचे कारण नाही.'' आजच्या काळात 'पर्व' या कादंबरीने तरी 'पौराणिक कादंबरी' म्हणून मोठा 'बॅकलॉग' भरून काढला आहे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये.अतिशय ध्येयवादी असणारे भैरप्पा आपल्या कादंबरीचे मूल्यमापन वाचकच करतील, असे नम्रपणे सांगतात. 'पर्व' अशी लिहली, या प्रस्तावनेतच ते 'पर्व' कादंबरीची प्रेरणा, स्वरूप व लेखनाचा दृष्टीकोण ते सोडून जातात. तसा हा गंभीर विषय त्यांच्या डोक्यात १३–१४ वर्षे घुटमळत होता. 'आनंदस्वामी' यांच्या लेखनाचा प्रभव तर त्यांच्यावर होताच परंतु प्राचीन भरतीय धर्मसंस्कृतीचाही पगडा त्यांच्या विचारांवर होता.

'श्री मन्महाभारताचे' मराठी सुरस भाषांतर' या ग्रंथात महाभारताच्या महत्त्वाचा पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो ''ऋषिहो, या इतिहास ग्रंथाचे महत्त्व फारच अगाध आहे. तिन्ही काली अबाधित असलेल्या तत्त्वांचे यात प्रतिपादन केले आहे; म्हणून या जगतीतलावर काही कवींनी पूर्वीच हा इतिहास सांगितला आहे.पु ढेही ते सांगतील. ब्राम्हणा दि तीन वर्णातील पुरूष म्हणजे द्विज हे या ग्रंथातील विषयांचे परिशीलन मोठ्या कळकळीणे करतात; या ग्रंथाचे ते संक्षेपाने व विस्ताराने पठण करतात. यातील सुंदर शब्दरचना, मनोहर अशी वैदिक व लौकिक आचारपद्धती आणि विविध छंद व मोहक वृत्ते ही अवलोकन करून मोठे मोठे विद्वान व रसिक पुरूषही माना डोलवितात.'' यावरून महाभारताची महती आपल्या लक्षात येते.

एखाद्या कलावंताच्या निर्मितीची प्रक्रिया कशी असते याची उत्सुकता वाचकांना नेहमी असते. 'पर्व' ही उत्कृष्ठ कलाकृती भारतीय वाचकांच्या पसंतीस उतरली. तिचे अनेक भाषेत अनुवाद झाल्यामुळे अनेक लोकांच्या मनात घर करून बसली. महाभारताचे लेखक महर्षी व्यास हे प्रतिभावान लेखक; त्यांनी महाभारताच्या रूपाने आपल्या हाती मोठे संचित दिले. यातून अनेक लेखकांना प्रेरणा मिळाली व त्यांच्या प्रतिभेला खाद्य पुरविले. यातले एक लेखक म्हणजे एस.एल. भैरप्पा. 'पर्व' मधून त्यांनी उभी केलेली पात्रे, त्यांचे परस्परांशी असलेले मनोव्यापार यांचा मागोवा घेऊन; स्वत:ची अलौकिक प्रतिभा पणाला लावून महाभारतातील पात्रे मानसिक विश्लेषणावर भर देऊन रंगविले.

७८८ पृष्ठांची ही दीर्घ कादंबरी असली तरी ती दीर्घ वाटत नाही. वाचक कादंबरी वाचतांना देहभान विसरतो. पात्रे मनाचा ठाव घेतात. पुढच्या घटनाक्रमावर लक्ष केंद्रीत करतात. भैरप्पा तत्त्वचिंतक असल्यामुळे 'पर्व' मध्ये महाभारतातील चमत्कारांचा, पापांचा आणि वरदानांचा भरभक्कम पडद्याआड लपलेल्या माणसांचा शोध घेतला. डॉ. उमा कुलकर्णी 'पर्व' च्या मलपृष्ठावर म्हणतात, ''आधुनिक मानववंशशास्त्रीय, समाजशास्त्रीय, संकल्पनांच्या प्रकाशझोतात महाभारतातल्या व्यक्तिरेखांच्या वर्तनाची संगती लावली. त्यामुळेच 'पर्व' ही महाभारताची एक विलक्षण प्रत्ययकारी अनुभूती देणारी कलाकृती ठरली. तशीच खळबळजनकही'' हा त्यांचा अभिप्राय अत्यंत बोलका आहे. 'पर्व'तील विविध आशय स्पष्ट करणारा आहे.

'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा' अशी समजूत त्याकळी होती आजही ते दिसते. अर्थात 'वंशवृद्धी' हा विषय 'पर्व'मध्ये महत्त्वाचा ठरतो. मांसभक्षण त्यावेळी होते. आजही आहे. महाभारतातील पात्रे मांसभक्षण करायचे. रूक्मरथ बऱ्याच दिवसांनी गावी आल्यामुळे मुद्दाम बैलाचं मांस शिजवलं होतं. त्याचा एक तुकडा तो मुकाट्यानं चघळत होता. तेव्हा, ''बैलाच्या मांसापुढे मेंढ्याचं मांस सपक वाटतं, नाही का?'' असं होमदत्तानं विचारलं, तरी रूक्मरथ मांस खाण्यातच गुंग झाला होता. कौरव–पांडवांच्या सुरवातीच्या काळापासून तर युद्ध संपेपर्यंतचा काळ या कादंबरीत चित्रित केला आहे. शब्दाच्या माध्यमातून, महाभारतातील पात्रे 'पर्व' मध्ये जीवंतपणे उभी केलेली असल्यामुळे या कादंबरीची उत्सुकता वाचकांच्या मनात शेवटपर्यंत कायम राहते.

**समारोप :**

'पर्व' या कादंबरीचे शिर्षक अतिशय अर्थपूर्ण आहे. वाचतांना महाभारतातील प्राचीन घडामोडींचा काळ, क्रम, प्रसंग कळल्यावर याची प्रचिती येते. 'पर्व' वाचल्यानंतर रसिक वाचकाच्या मनता जे प्रश्न निर्माण होतात. 'हे सर्व उपद्व्याप कशासाठी?' याचे उत्तर एकच मिळते ते म्हणजे दाजी पनशीकरांनी म्हटल्याप्रमाणे ''महाभारत एक सूडाचा प्रवास असून, या जगन्मान्य ग्रंथाचा केंद्रबिंदू सूड आहे.'' असे म्हटले आहे. भैरप्पांनी महाभारताकडे पाहतांना तत्त्वचिंतकांच्या सनातन दृष्टीएवढीच वर्तमानावरची आपली नजर चोख ठेवली आहे. तत्त्वज्ञानात काळ आणि दिशा या दोन्ही गोष्टींना एका मर्यादेपर्यंत अर्थ असतो. काळ पुढे गेला हे आपण अनुभवत असलेले वास्तव मर्यादित अर्थानेच खरे असते. तत्त्वज्ञानात मात्र तसे काही घडत नाही. भैरप्पांनी या तत्त्वज्ञानाच्या अंगानेच 'पर्व' ची रचना केली. म्हणून 'पर्व' ही पौराणिक कादंबरी महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भग्रंथ :**


१. कुलकर्णी उमा, (अनु.), 'पर्व', (मूळ ले. एस. एल. भैरप्पा), मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे, चौथी आवृत्ती, ऑगस्ट, २००३
२. कुलकर्णी उमा, (अनु.), 'माझं नाव भैरप्पा', (मूळ ले. एस. एल. भैरप्पा), राजहंस प्रकाशन, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट, २००४
३. टिळक विद्यागौरी, शाह मृणालिनी, (संपा:), 'भैरप्पांचे कादंबरी विश्व', चंद्रकलाप्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, जाने, २००७
४. पणशीकर दाजी, 'महाभारत एक सूडाचा प्रवास', रविराज प्रकाशन, आठवी आवृत्ती, २००४
५. बांदिवडेकर चंद्रकांत, मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, व्दितीय आवृत्ती, ऑक्टो, १९९६
६. व्यास, 'महाभारत' (भाग, १, २, ३, ४, ), (संपा:), भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, (१९७१,१९७५)
७. नवभारत, डिसेंबर, २००८